ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

ENGLISH / MARATHI PART - II

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | शोधनिबंध आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान<br>**डॉ. गंगणे जीवन सुदामराव** | १-५ |
| २ | सत्यशोधकीय विचारवंत आण्णाभाऊ साठे<br>**प्रा. डॉ. सावंत जे. सी.** | ६-९ |
| ३ | साहित्यिक अणाभाऊ साठे यांचे योगदान<br>**डॉ. उर्मिला क्षीरसागर** | १०-१४ |
| ४ | अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक कथात्मक साहित्यातील स्त्री चित्रण<br>**प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते** | १५-२१ |
| ५ | आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद संघर्ष आणि स्थानिक इतिहासाचे वास्तववादी चित्रण<br>**प्रा. डॉ. वंदना रा. लोंढ** | २२-२५ |
| ६ | खिरविरे येथील सावकारांच्या वह्यांची होळी (७ नोव्हेंबर १९४९)<br>**डॉ. गणेश शंकर विधाटे** | २६-२८ |
| ७ | दुसऱ्या महायुद्धातील यशवंत घाडगे यांची कामगिरी<br>**किरण गणपत कुंभार** | २९-३१ |
| ८ | प्रजाहितदक्ष जयसिंगराव घाटगे<br>**राजेंद्र मा. घाडगे** | ३२-३६ |
| ९ | घारापुरी लेणीचा एक ऐतिहासीक अभ्यास<br>**डॉ. भानुदास धोंडिबा शिंदे** | ३७-४१ |
| १० | डॉ. संजीवनी सतीष केळकर यांचे कार्य<br>**डॉ. एस. एन. गायकवाड** | ४२-४५ |
| ११ | उत्तर पेशवेकालीन तुरुंग व्यवस्था<br>**प्रिया ब्रिजेश कुलकर्णी** | ४६-४८ |
| १२ | शेतकऱ्यांच्या व्यथा व महात्मा फुले यांचे उपाय<br>**प्रा. कोकाटे अनिल दत्तात्रय** | ४९-५२ |




Scanned with OKEN Scanner

# ६. खिरविरे येथील सावकारांच्या वह्यांची होळी (७ नोव्हेंबर १९४९)

**डॉ. गणेश शंकर विधाटे**
इतिहास विभाग, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर.

**महत्वाचे शब्द** :— रोखेफाडी, गहाणखते, खरेदीखते, सालखते, लाल बावटा

**प्रस्तावना**

अहमदनगर जिल्हा हा जहाल शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. 'शेतकरी आम्ही झालो समदं लाल बावटेवालं' असे अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट विचारांचे शेतकरी अभिमानाने म्हणत असत. जिल्हयातील कम्युनिस्ट पक्ष मजबूत करण्याचे काम या शेतकरी चळवळीच्या माध्यमातून झालेले दिसून येते. अशा या शेतकऱ्यांची नगर जिल्हयातील संघटित चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली ती कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली किसान सभेची स्थापना झाल्यापासून. किसान सभेच्या अजेंड्यावर असलेला महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे सावकारशाही विरोधी दस्तऐवजे ताब्यात घेऊन ती फाडणे अगर नष्ट करणे होय. या सावकारशाही विरोधी चळवळीचा महत्वाचा भाग म्हणजे नगर जिल्हयातील खिरविरे येथील सावकारांच्या वहयांची होळी होय.

१. **खिरविरे गावातील सावकारांची पूर्वपीठिका :—** सावकारशाहीला विरोध हा कम्युनिस्टांचा एक प्रभावी कार्यक्रम होता. अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्याच्या वायव्य भागात खिरविरे हे एक दुर्गम गाव आहे. गावातील बहुसंख्य लोक आदिवासी शेतकरी होते.[१] या गावात शहा, मेहता या आडनावांची व्यापारी सावकारांची ७—८ कुटुंबे मोटमोटया वाड्यात वास्तव्य करून होती. डांग, टोकद, घोटी, इगतपूरी, समशेरपूर इत्यादी गावांमध्ये त्यांची मोठी सावकारी होती. ते लोकांच्या निरक्षरता, अडचणीचा गैरफायदा घेऊन कर्जाच्या बदल्यात खोटी दस्तऐवज लिहून घेत असत. फसवला गेलेला शेतकरी न्यायालयात गेला असता तेथे त्याचा टिकाव लागत नसे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या सावकारांनी गिळंकृत केलेल्या होत्या. त्यामुळे या शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष होता.[२]

२. **सावकारी दस्तऐवज बाहेर काढून त्याची होळी करण्याचा कार्यक्रम** :— महाराष्ट्र राज्य किसान सभेची पहिली परिषद ठाणे जिल्हयातील टिटवाळयाला १२ जानेवारी १९४५ रोजी भरली. महाराष्ट्रातील किसान सभेची अध्वर्यू होते कॉ.शामराव परूळेकर आणि गोदूताई परूळेकर. ऐतिहासिक कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील वारली आदिवासींचे बंड सुरू झाले ते किसान सभेच्या या परिषदेतून स्फूर्ती घेवूनच. मे १९४५ मध्ये ठिणगी पडलेल्या या बंडाचा वणवा सर्व आदिवासी भागात दोन वर्षात पसरला. या वणव्यात सर्व प्रकारची वेठबिगारी आणि गुलामगिरी

जळून राख झाली.[३] या परिषदेतील कार्यक्रमानुसार सन १९४६ साली गुहा, राहुरी येथील शिबीरामध्ये कॉ.शामराव परूळेकर व गोदूताई परूळेकर यांनी सावकारांचे दस्तऐवज बाहेर काढून त्यांची सार्वजनिक ठिकाणी होळी करावयाची, आदिवासी कर्जमुक्त झाला असे घोषित करावयाचे असा विचार मांडला होता.[४]

३. **सावकारशाही विरोधी चळवळीची कार्यवाही** :– कॉ. मुरलीधर नवले, कुशाबा नवले, भाऊसाहेब थोरात, कॉ. धर्मा कमा भांगरे, कॉ. सक्रुभाई मेंगाळ यांनी अकोले व संगमनेर तालुक्यातील कार्यकर्त्यांची एक बैठक बोलावली. बैठकीत सावकारांच्या घरावर मोर्चा काढून त्यांच्या ताब्यातील शेतकऱ्यांची गहाणखते, खरेदीखते, सालखते ताब्यात घेऊन त्यांची भर चौकात होळी करावे असा कार्यक्रम ठरला.[५]

या मोहिमेचे नेतृत्व कॉ. मुरलीधर नवले यांनी करावे असे ठरले. ७ नोव्हेंबर हा रशियन राज्यक्रांतीचा स्मृतीदिन. सावकारांजवळची कागदपत्रे जाळण्यासाठी कार्यकर्त्यांनी हा दिवस जाणीवपूर्वक निवडला. राजूर, अकोले, राजापूर, संगमनेर, खिरविरे इत्यादी गावातील १०० कार्यकर्त्यांनी लाल बावटयाचा जयजयकार करीत खिरविरे गावात प्रवेश केला व सावकारांच्या घराला वेढा घातला. आपल्याकडील सर्व कागदपत्रे जमा करण्याचे सावकारांना आवाहन केले. सावकारांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करून दरवाजे बंद केले. अखेर बळजबरीने एकएका सावकाराच्या घरात प्रवेश करून तिजोरीतील कर्जाचे दस्तऐवज गोळा केले आणि गावातील मंदिरासमोर उपस्थित लोकांसमोर त्यांची जाहीर होळी केली. यावेळी सावकारांच्या घरातील बायकामुलांना कोणत्याही प्रकारचा त्रास कार्यकर्त्यांनी दिला नाही. तसेच त्यांच्या रोकड व दागिन्यांना हातही लावला नाही. जमलेल्या जमावाला उद्देशून कॉ. मुरलीधर नवले म्हणाले, ''भावा–बहिणींनो सावकारांच्या जाचातून तुम्ही आता मुक्त झाला आहात. तुमच्या जमिनींचे खोटे दस्तऐवज तुमच्या सर्वांच्या साक्षीने आगीच्या भक्षस्थानी पडले आहेत. आता तुम्ही घाबरायचे कारण नाही. तुम्ही कर्जमुक्त झालात. तुमच्या जमिनी जर सावकारांनी ताब्यात घेतल्या असतील, तर लगेच आजपासून तुम्ही कसायला सुरूवात करा. किसान सभा सदैव तुमच्या पाठीशी आहे. सावकारांनी अरेरावी व अत्याचार केले तर आम्हाला बोलवा. बोला लाल बावटे की जय.''[६]

४. **सरकारी दडपशाही** :– खिरविरे प्रकरणाची बातमी जिल्हयात वाऱ्यासारखी पसरली. कॉ.बुवासाहेब नवले, कॉ. कुशाभाऊ नवले, कॉ. मुरलीधर नवले यांच्याकडे बंदुका असूनही त्यांनी त्याचा प्रत्यक्ष वापर केला नाही.[७] मात्र एका सावकाराने पोलीस स्टेशनला या नेत्यांच्या विरोधात खून आणि दरोड्याची तक्रार केली. परतु पोलिसांची धाड पडण्याआधीच प्रमुख नेते भूमिगत झाले. मात्र काहींना अटक करण्यात आली. अटक झालेल्यांमध्ये निवृत्ती गोडसे, विठ्ठल हासे यांचा समावेश होता. सरकारने या घटनेनंतर कॉ. मुरलीधर नवले, रावसाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, कॉ. धर्मा कमा भांगरे यांच्यावर हजारो रूपयांची बक्षिसे लावली. अहोरात्र त्यांच्या मागे पोलिसांचा ससेमारा लागला. त्यांना आश्रय देणाऱ्यांचा पोलिसांनी छळ आरंभला. पोलिसांच्या दडपशाहीचा सर्वत्र वरवंटा फिरू लागला.[८]

खिरविरे प्रकरण हे दक्षिणेतील रोखेफाडीच्या (दख्खनचे दंगे) चळवळीशी साधर्म्य दाखविणारी चळवळ होती. सावकारांच्या वह्यांची होळी करण्याची घटना ही आदिवासी भागातील एक क्रांतिकारी घटना ठरली. या घटनेचा निर्णय स्थानिक नेत्यांनी घेतलेला होता. आपल्यावर अन्याय करणाऱ्यांना कम्युनिस्टांनी धडा शिकवल्याचे उदगार जनतेच्या मुखातून निघत होते. त्यामुळे त्यांनी या कृतीचे भरभरून समर्थन केले अशी नोंद रावसाहेब शिंदे आपल्या 'ध्यासपर्व' या आत्मचरित्रात करतात.[९]

**संदर्भसूची**

१. https://www.swapp.co.in/site/newvillage.php?stateid=8y68qEDJ0ugeDsGafWxiUw%3D%3D&districtid=Gzqu0R2%3BQznAgPCZAHlkdA%3D%3D&subdistrictid=cJBMqm8xqVILPwNDLFeFuw%3D%3D&areaid=P%2F8CBV%2FYHKhxJYqUIDZ9OQ%3D%3D, last seen at 01/09/2020

२. शिंदे रावसाहेब, 'ध्यासपर्व. A Reble for a Cause', अमेय प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती २००९, पृ.क्र. २२६.

३. https://www.mahacpim.in/our-history-marathi/, last seen at 02/09/2020

४. कडू पी.बी., क्रांतिपंढरीचा वारकरी (शब्दांकन: सविता भावे), प्रकाशक, अरूण पुंजाजी कडू, सात्रळ, राहुरी, सप्टेंबर २०१४, पृ.क्र.६२.

५. https://mr.wikipedia.org/wiki%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B8%E0%A4%8D%E0%A4%95%E0%A4%B0%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B5_%E0%A6%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%B5%E0%A5%87, last seen at 02/09/2020

६. शेवाळ विठ्ठल, पेटलेले दिवस – संगमनेर अकोल्याच्या कम्युनिस्ट पक्षाचा प्रेरक इतिहास, प्रकाशक कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिल्डिंग, बिंदू चौक, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, २००९, पृ.क्र.५३, ५४.

७. ढोले अशोक एकनाथ, कॉ.पी.बी.कडू पाटील जीवन व कार्य : एक चिकित्सक अभ्यास (१९२१–१९९६), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१४

८. http://nawalewadi.com/history.html, last seen at 03/09/2020

९. शिंदे रावसाहेब, ध्यासपर्व. A Rebel for a cause, उपरोक्त, पृ.क्र.२२७.



Scanned with OKEN Scanner